021

2005121516292800l

(१९९६ नंतरच्या निवृत्तिवेतनधारकांसाठी)

# महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मध्ये फेरबदल करणेबाबतचे आदेश

**महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मध्ये फेरबदल करण्याबाबत**

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक-सेनिवे १०९९/३०२/सेवा-४,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९.

पहा : शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-सेनिवे १०९९/२३८/सेवा-४ दिनांक २९ जुलै १९९९.

## निर्णय

**शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-सेनिवे १०९९/२३८/सेवा-४, दिनांक २९ जुलै १९९९ मधील आदेश अधिक्रमित करून,** शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील निवृत्तिवेतन, निवृत्ति/मृत्यू उपदान आणि कुटुंब निवृत्तिवेतन नियमित करणाऱ्या नियमांमध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करण्याचा निर्णय घेतला असून हे फेरबदल शासकीय कर्मचारी तसेच उपरोल्लेखित नियम ज्यांना लागू आहेत अशा इतर कर्मचाऱ्यांना लागू राहतील.

### अंमलबजावणीचा दिनांक

२. **या आदेशान्वये सुधारित केलेल्या तरतुदी दिनांक १ जानेवारी १९९६ रोजी किंवा त्यानंतर निवृत्त होणाऱ्या/सेवेत असताना मृत्यू पावलेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू होतील.** दिनांक १ जानेवारी १९९६ पूर्वी निवृत्त झालेल्या/मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-सेनिवे १०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ अन्वये स्वतंत्र आदेश काढण्यात आले आहेत.

३. १ जानेवारी १९९६ रोजी किंवा त्यानंतर निवृत्त/मृत झालेल्या/होणाऱ्या ज्या प्रकरणी निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्ति-वेतन/उपदान/निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण यापूर्वीच प्राधिकृत करण्यात आले आहे किंवा अद्यापी प्राधिकृत करावयाचे आहे अशा प्रकरणी ते या आदेशानुसार सुधारित करण्यात येईल. तथापि, ज्या प्रकरणात सुधारणापूर्व आदेशानुसार प्राधिकृत झालेले निवृत्तिवेतन हे, या आदेशानुसार देय होणाऱ्या निवृत्तिवेतनापेक्षा अधिक फायदेशीर असेल त्या प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १३१ लक्षात घेऊन, निवृत्तिवेतनधारकास गैरफायदेशीर होईल अशा प्रकारे आधीच प्राधिकृत झालेल्या निवृत्तिवेतनात सुधारणा करण्यात येणार नाही.

### वेतन

४. निवृत्तिवेतनविषयक विविध लाभांच्या परिगणनेसाठी '' वेतन '' या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ९ (३६), (एक) मध्ये व्याख्या केल्यानुसार, शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या निवृत्तिपूर्वी/मृत्यूच्या दिनांकापूर्वी मिळत असलेले मूळ वेतन असा राहील.

५. सदरहू आदेशांमध्ये '' वेतन '' या संज्ञेचा अर्थ, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ प्रमाणे अंमलात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीतील वेतन असा राहील.

### निवृत्तिवेतन

६. सर्वच प्रकरणी, निवृत्तिवेतनाची परिगणना '' निवृत्तिवेतनार्ह वेतनाच्या '' ५० टक्के अशी करण्यात येईल व या निवृत्तिवेतनाची किमान मर्यादा दरमहा रुपये १,२७५ आणि कमाल मर्यादा राज्य शासनाकडील उच्चतम अनुज्ञेय वेतनाच्या ५० टक्के अशी राहील (उच्चतम वेतन दिनांक १ जानेवारी १९९६ पासून रुपये २४,५००/- असे आहे.) परंतु कोणत्याही प्रकरणी संपूर्ण निवृत्तिवेतन हे सेवानिवृत्तिच्या वेळी त्या शासकीय कर्मचाऱ्याने शेवटी धारण केलेल्या पदासाठी १ जानेवारी, १९९६ पासून

लागू केलेल्या सुधारित वेतनश्रेणीतील किमान वेतनाच्या ५० टक्के पेक्षा कमी नसेल, तथापि जेथे निवृत्तिवेतनधारक त्याला नियत वयमान/निवृत्तिच्या दिनांकाला लागू असलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११० प्रमाणे संपूर्ण निवृत्तिवेतन मिळण्यासाठी आवश्यक असलेली कमाल सेवा पूर्ण करीत नसेल तेथे कमी सेवेच्या प्रमाणात यथायोग्य असे निवृत्तिवेतन कमी करण्यात येईल. मात्र कोणत्याही प्रकरणी हे निवृत्तिवेतन दरमहा रुपये १,२७५ पेक्षा कमी नसेल. **जोडपत्र-१** मध्ये नमुन्यादाखल उदाहरण देण्यात आले आहे.

## निवृत्ति उपदान/मृत्यू उपदान

७. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ९ (३६) (एक) मध्ये व्याख्या केल्यानुसार मूळ वेतनावर निवृत्ति/मृत्यू उपदानाची परिगणना करण्यात येईल. उपदानाच्या रकमेच्या सध्याच्या कमाल मर्यादेत, म्हणजे वेतनाच्या साडेसोळा पट किंवा अडीच लाख, यापैकी जी कमी असेल ती, कोणताही बदल करण्यात आलेली नाही.

## कुटुंब निवृत्तिवेतन, १९६४

८. कुटुंब निवृत्तिवेतनाची परिगणना सर्वच प्रकरणी टप्पा पद्धतीऐवजी मूळ वेतनाच्या ३० टक्के अशा एकरुप दराने करण्यात येईल व या कुटुंब निवृत्तिवेनाची किमान मर्यादा दरमहा रुपये १,२७५ आणि कमाल मर्यादा राज्य शासकनाकडील उच्चतम अनुज्ञेय वेतनाच्या ३० टक्के अशा राहील. (उच्चतम वेतन-दिनांक १ जानेवारी १९९६ पासून रुपये २४,५००/- असे आहे.) कुटुंब निवृत्तिवेतन, १९६४ शी संबंधित असलेला महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ मधील नियम ११६ (२) हा त्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आला असून या नियमातील सध्या अस्तित्वात असलेला तक्ता यापुढे अंमलात राहणार नाही.

## निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण

९. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मधील नियम ५ (१) मध्ये विहित केलेली सध्याची निवृत्तिवेतनाच्या अंशराशीकरणाची (म्हणजे निवृत्तिवेतनाच्या एक तृतीयांश पेक्षा अधिक नाही) मर्यादा आताही तशीच राहील. तथापि, या आदेशांच्या परिणामी अतिरिक्त निवृत्तिवेतन देय असल्यास त्याचे अंशराशीकरण करता येईल. निवृत्तिवेतनधारक, त्यांची तशी इच्छा असल्यास, अतिरिक्त निवृत्तिवेतनाच्या (फरक) १/३ इतक्या मर्यादेपर्यंत अंशराशीकरण करू शकतील.

१०. सुधारित वेतनश्रेणीसाठी विकल्प दिलेल्या व सुधारित वेतनश्रेणी लागू झाल्याच्या दिनांकापासून १० महिन्यांच्या आत सेवानिवृत्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी निवृत्तिपूर्वीच्या १० महिन्यांच्या कालावधीसाठी मूळ वेतन परिगणीत करण्यासाठी खालीलप्रमाणे वेतन विचारात घेण्यात येईल :—

**(१) असुधारित वेतनश्रेणीत वेतन घेतलेल्या कालावधीसाठी**—मूळ वेतन अधिक प्रत्यक्ष महागाई भत्ता आणि त्या मूळ वेतनाशी समुचित दराने संबंधित कालावधीमध्ये घेतलेली अंतरिम वाढ-१ व अंतरिम वाढ-२,

**आणि**

**(२) सुधारित वेतनश्रेणीत वेतन घतलल्या कालावधीसाठी**—सुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतन.

## महागाई वाढ

११. या आदेशानुसार अनुज्ञेय होणाऱ्या निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतनावर १ जानेवारी १९९६ नंतरची महागाई वाढ सुधारित पद्धतीनुसार दिली जाईल. याबाबतचे आदेश शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-निमवा-१०९९/३०५/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ अन्वये स्वतंत्रपणे काढण्यात आले आहेत.

## थकबाकी

१२. **मा. उच्च न्यायालय, मुंबई यानी सू-मोटो रिट पिटीशन-क्र. २४३२/१९९९ व रिट पिटीशन-क्र. १७४७/१९९९ या प्रकरणी दिनांक २४ ऑगस्ट १९९९ रोजी दिलेल्या निवाड्याच्या परिणामी १ जानेवारी १९९६ ते ३० जून १९९९ पर्यंतच्या कालावधीसाठी सुधारित निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन, निवृत्तिवेतनावरील महागाई वाढ, उपदान, निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण यांची थकबाकी ३ समान वार्षिक हप्त्यात दिली जाईल. त्यापैकी पहिला हप्ता चालू आर्थिक वर्षात म्हणजे ३१ मार्च २००० पूर्वी देण्यात येईल व पुढील दोन हप्ते नंतरच्या दोन आर्थिक वर्षात देण्यात येतील.**

१३. **दिनांक १ जानेवारी १९९६ ते ३० जून १९९९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या/सेवेत असताना मृत्यू पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी निवृत्तिवेतन, कुटुंब निवृत्तिवेतन, उपदान आणि निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण निर्धारीत करणे आणि त्यांचे तात्पुरत्या स्वरुपात प्रदान करणे याबाबतची विशेष कार्यपद्धती.**

निवृत्तिवेतन, कुटुंब निवृत्तिवेतन, उपदान आणि निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण निर्धारीत करणे व प्राधिकृत करणे यासंबंधीची सविस्तर कार्यपद्धती अनुक्रमे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या प्रकरण १० व ११ मध्ये आणि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मध्ये विहित करण्यात आलेली आहे. सर्वसाधारपणे, निवृत्तिवेतनविषयक लाभांचे निर्धारण व प्राधिकृती वरील कार्यपद्धतीनुसार केली जाते. **तथापि, १ जानेवारी १९९६ व ३० जून १९९९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या/सेवेत असताना मृत्यू पावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, त्यांचे निवृत्तिवेतनविषयक लाभ या आदेशांच्या तरतुदीनुसार निर्धारित व प्राधिकृत करण्यासाठी महालेखापाल (ले. व अ.)-१, महाराष्ट्र, मुंबई यांच्या सल्ल्याने वरील कार्यपद्धती शिथिल करण्याचा आणि खालील कार्यपद्धती अवलंबिण्याचा निर्णय घेण्यात आला आहे :--**

(ए) ज्या प्रकरणी, निवृत्तिवेतनविषयक लाभ, यथास्थिती, महालेखापाल, मुंबई/नागपूर यांनी असुधारित वेतनानुसार प्राधिकृत केलेले असतील आणि त्याबाबतची प्राधिकारपत्रे निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकाऱ्यांकडे म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांचेकडे पाठविली असतील, अशा प्रकरणी विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी त्यांनी निश्चित केलेल्या सुधारित वेतनावर **[वेतन पडताळणी पथकाकडून महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ नुसार केलेली वेतन निश्चितीची पडताळणी केली जाण्याची प्रतिक्षा न करता]**, सुधारित तात्पुरते निवृत्तिवेतनविषयक लाभ या आदेशानुसार परिगणित करावे आणि निवृत्तिवेतनधारकांकडून **जोडपत्र-२** मध्ये दर्शविल्याप्रमाणे वचनपत्र प्राप्त करून कोणत्याही परिस्थितीत ३१ मार्च २००० पूर्वी त्याच्या पहिल्या हप्त्याचे तात्पुरत्या स्वरूपात प्रदान करावे. **जोडपत्र-३** मध्ये नमुन्यादाखल एक उदाहरण देण्यात आलेले आहे. निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकाऱ्यांनी, म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी, अशा मागण्या प्राथम्याने संमत कराव्यात.

(बी) खालील प्रकरणी देखील वरील कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी.

(एक) ज्या प्रकरणी महालेखापाल, मुंबई/नागपूर यांचेकडून निवत्तिवेतनविषयक लाभ प्राधिकृत झालेले नाहीत, परंतु विभागप्रमुख/कार्यालय प्रमुखांनी तात्पुरते निवृत्तिवेतन विषयक लाभ प्रदान केलेले आहेत.

(दोन) ज्या प्रकरणी तात्पुरत्या निवृत्तिवेतनविषयक लाभांसह कोणतेही निवृत्तिवेतनविषयक लाभ प्रदान करण्यात आलेले नाहीत.

(सी) ज्या प्रकरणी महालेखापाल, मुंबई/नागपूर यांनी असुधारित वेतनानुसार निवृत्तिवेतनविषयक प्रदान आदेश निर्गमित केलेले असतील आणि निवृत्तिवेतनधारक असे मासिक निवृत्तिवेतन घेत असेल अशा प्रकरणी विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी निवृत्तिवेतनधारक जेथून निवृत्तिवेतन घेत असेल तेथील, यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांना कळविणे आवश्यक आहे. विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्याकडून अशा प्रकारची माहिती प्राप्त होताच निवृत्तिवेतन संवितरण अधिकारी म्हणजे यथास्थिति, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांनी त्यानुसार मासिक निवृत्तिवेतनात सुधारणा करावीं व अशा सुधारित निवृत्तिवेतनांचे प्रदान, महालेखापाल, मुंबई/नागपूर यांचेकडून अंतिम सुधारित निवृत्तिवेतन प्रदान आदेश निर्गमित केले जाईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात करावे.

(डी) त्यानंतर विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी सेवा पुस्तकात वेतन पडताळणी पथकाकडून करण्यात आलेल्या वेतन पडताळणीसंबंधी, तसेच तात्पुरते निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन/उपदान/निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य इत्यादीसंबंधीच्या आवश्यक त्या नोंदी घेऊन सेवापुस्तकासह निवृत्तिवेतनविषयक कागदपत्रे यथास्थिती, महालेखापाल, मुंबई/नागपूर यांचेकडे सुधारित निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन/उपदान आणि निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य यांच्या सुधारित रकमा प्राधिकृत करण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत ३० सप्टेंबर २००० पूर्वी पाठवावीत.

(इ) या आदेशानुसार सुधारित केलेल्या निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन/उपदान आणि निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य यांची प्राधिकारपत्रे निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी/विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना थकबाकीचा दुसरा हप्ता देय ठरण्यापूर्वी म्हणजे ३१ मार्च २००१ पूर्वी पाठविली जातील आणि याबाबतची माहिती संबंधित निवृत्तिवेतनधारकास देण्यात येईल याची खातरजमा करण्याची विनंती महालेखापाल, मुंबई/नागपूर यांना करण्यात येत आहे.

(एफ) महालेखापाल, मुंबई/नागपूर यांचेकडून अंतिम सुधारित निवृत्तिवेतन प्रदान आदेश/उपदान प्रदान आदेश/निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य प्रदान आदेश प्राप्त झाल्यानंतर, विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी तात्पुरत्या प्रदानांचे व असल्यास अतिप्रदानांचे समायोन करून नंतरच्या आर्थिक वर्षामध्ये थकबाकीचा दुसरा व तिसरा हप्ता काढून त्यांचे वितरण करावे.

(जी) ज्या प्रकरणी महालेखापाल, मुंबई/नागपूर यांनी असुधारित वेतनाच्या आधारे निवृत्तिवेतन प्रदान आदेश/उपदान प्रदान आदेश/निवृत्तिवेतनाचे अंशराशीकृत मूल्य प्रदान आदेश, यापूर्वीच प्राधिकृत केलेले असतील, अशा प्रकरणी सुधारित प्राधिकारपत्रे निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकाऱ्यांना म्हणजे यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांना विद्यमान निवृत्तिवेतन प्रदान आदेशांच्या क्रमांकाखालीच पाठविण्यात येतील. निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी हे प्राधिकारपत्र निवृत्तिवेतन प्रदान आदेशांच्या दोन्ही भागांस जोडतील.

(एच) ज्या प्रकरणी निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक त्यांचे निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन महाराष्ट्र राज्याव्यतिरिक्त अन्य राज्यातील कोषागारातून घेत असतील त्यांची प्रकरणे नेहमीप्रमाणे ठळकपणे दर्शवून यथास्थिती, महालेखापाल, मुंबई/नागपूर यांचेकडे पाठवावीत. जेणेकरून त्यांना स्पेशल सिल ॲथॉरिटी (Special Seal Authority) निर्गमित करता येईल.

१४. **दिनांक १ जुलै १९९९ रोजी किंवा त्यानंतर निवृत्त होणाऱ्या/सेवेत असताना मृत्यू पावलेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निवृत्तिवेतनविषयक लाभांचे निर्धारण व प्राधिकृती याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ मध्ये विहित केलेली नेहमीची कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी.**

१५. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतनाची योजना लागू केली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यामधील कर्मचाऱ्यानाही वरील निर्णय, योग्य त्या फेरफारांसह, लागू राहतील.

१६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांनाही लागू राहतील.

१७. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील यासंबंधीच्या विद्यमान तरतुदींमध्ये स्वतंत्रपणे सुधारणा करण्यात येत आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील ज्या तरतुदींमध्ये या आदेशान्वये स्पष्टपणे सुधारणा करण्यात आलेल्या नाहीत त्या अबाधित राहतील.

१८. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदात नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तिवेतनविषयक लाभ ज्या अर्थसंकल्पीय शिर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तथापि, आवश्यक असल्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरील निवृत्तिवेतनधारकासंबंधातील खर्च भागविण्यासाठी विधीमंडळाच्या येत्या अधिवेशनात पूरक मागणी सादर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

१९. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे. वरील परिच्छेदांमध्ये नमूद केलेली **जोडपत्र-१, जोडपत्र-२** व **जोडपत्र-३** ही, इंग्रजी प्रतीसोबत जोडल्याप्रमाणे असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वसन्त वा. चौधरी,**
**शासनाचे उपसचिव.**

प्रति,

भारत सरकारचे सचिव, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (५२० प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०.प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र. ३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई.
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती)
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

---

***पत्राद्वारे.**

*Modifications in the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982.*

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**FINANCE DEPARTMENT**

Resolution No. PEN-1099/302/SER-4,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 15th November 1999.

*Read.*— Government Resolution, Finance Department, No. PEN 1099/238/SER-4, dated 29th July 1999.

***RESOLUTION***

**In supersession of the orders contained in Government Resolution, Finance Department, No. PEN-1099/238/SER-4, dated 29th July 1999,** Government is pleased to introduce the following modifications in the rules regulating Pension, Retirement/Death Gratuity and Family Pension under the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 which will apply to State Government employees and others governed by the above rules.

**Date of Effect :**

2. **The revised provisions as per these orders shall apply to State Government servants who retire/die in harness on or after 1st January 1996.** Separate orders have been issued in respect of employees who retired/died before 1st January 1996 under Government Resolution, Finance Department, No. PEN-1099/303/SER-4, dated 15th November 1999.

3. Where Pension/Family Pension/Gratuity/Commutation of Pension has already been authorised or yet to be authorised in cases of retirement/death occurring on or after 1st January 1996, the same shall be revised in terms of these orders. However, in cases where pension has been finally authorised on pre-revised orders and if it happens to be more beneficial than the pension becoming due under these orders, the pension already authorised shall not be revised to the disadvantage of the pensioners in view of rule 131 of Maharashtra Civil Services (Pension)Rules, 1982.

**Pay :**

4. The term "Pay" for purposes of calculating various pensionary benefits shall mean basic pay as defined in Rule 9(36)(i) of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982, which the Government servant was receiving immediately before his retirement or on the date of his death.

5. The term "Pay" in these orders means the pay in the revised scales promulgated under the Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 1998.

**Pension :**

6. Pension shall be calculated at 50% of "Pensionable Pay" in all cases and shall be subject to a minimum of Rs. 1275 per month and a maximum of upto 50% of highest pay admissible in the State Government, (which is Rs. 24,500 per month since 1st January 1996), but the full pension in no case shall be less than 50% of the minimum of the revised scale of pay introduced with effect from 1st January 1996 for the post last held by the employee at the time of his retirement. However, such pension will be suitably reduced pro-rata,

where the pensioner has less than the maximum required service for pension as per rule 110 of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 applicable to the pensioner as on the date of his superannuation /retirement and in no case it will be less than Rs. 1,275 per month. By way of illustration an example is given as **Annexure-I.**

**Retirement Gratuity/Death Gratuity :**

7. Retirement/Death Gratuity shall be calculated on the basic pay as defined in Rule 9(36)(*i*) of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982. There will be no change in the existing upper ceiling of maximum amount of gratuity i.e. 16½ times of pay or Rs. Two Lakh Fifty Thousand, whichever is less.

**Family Pension, 1964 :**

8. Family Pension shall be calculated at a uniform rate of 30% of Basic pay in all cases instead of slab system and subject to a minimum of Rs. 1275 per month and maximum of 30% of the highest pay admissible in the State Government (which is Rs. 24,500/-per month since 1st January 1996). Rule 116(2) relating to Family Pension, 1964 under the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 shall stand modified to this extent and the existing table thereunder will be no longer operative.

**Commutation of Pension :**

9. The existing limit on commutation of pension (i.e. not exceeding 1/3rd of pension) prescribed in Rule 5(1) of the Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984 shall continue to apply. However, additional pension, if any, becoming due as a result of these orders will qualify for commutation. Pensioners can commute upto 1/3rd of the additional pension (difference), if they so desire.

10. In the case of Government servants who have opted for the revised scales of pay and retired within 10 months from the date of coming over to the revised scale, basic pay for 10 months period, preceding retirement shall be calculated by taking into account pay as follows.—

    (*i*) **For the period during which pay is drawn in pre-revised scale**—Basic pay plus actual Dearness Allowance and Interim Relief I and II appropriate to the basic pay at the rates in force, drawn during the relevant period;

    *and*

    (*ii*) **For the period during which pay is drawn in revised scale.**—Basic pay in the revised scale.

**Dearness Relief :**

11. The Pension/Family Pension in terms of these orders will qualify for dearness relief beyond 1st January 1996 in accordance with the revised scheme of Dearness Relief for which orders have been issued separately, under Governement Resolution, Finance Department, No. DRP-1099/305/SER-4, dated 15th November 1999.

**Arrears :**

12. **Consequent to the Hon'ble High Court, Mumbai, judgment, dated 24th August 1999 in suo-moto Writ Petition No. 2432/1999 and Writ Petition No. 1747/1999, arrears on account of revised Pension/Family pension, Dearnes Relief on Pension, Gratuity, Commutation of pension for the period from 1st January 1996 to 30th June 1999 will be payable, in 3 equal annual installments out of which 1st installment will be paid during the current financial year i.e. before 31st March 2000 and the next two installments in two financial years to follow.**

## 13. SPECIAL PROCEDURE FOR DETERMINATION OF PENSION, FAMILY PENSION/ GRATUITY AND COMMUTATION OF PENSION AND PROVISIONAL PAYMENT THEREOF FOR THOSE GOVERNMENT SERVANTS WHO RETIRED/DIED IN HARNESS BETWEEN 1ST JANUARY 1996 AND 30TH JUNE1999.

A detailed procedure for determination and authorisation of amounts of pension, family pension, gratuity and commutation of pension has been prescribed in chapters X and XI of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 and in the Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984, respectively. Normally, the determination and authorisation of pensionary benefits is made after following the above procedure. **However, in cases of Government Servants who have retired/died in harness between 1st January 1996 and 30th June 1999, it has been decided in consultation with the Accountant General (A & E)-1, Maharashtra, Mumbai to relax the above procedure for the determination and authorisation of their pensionary benefits in terms of these orders and to adopt the following procedure.—**

(*a*) Where pensionary benefits are authorised on the basis of pre-revised pay by the Accountant General, Mumbai/Nagpur, as the case may be, and authorities are sent to the Pension Disbursing Authorities i.e. Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officer, as the case may be, the Heads of Departments/Offices should work out revised provisional pensionary benefits as per these orders, on the basis of revised pay fixed by them **(without waiting for verification of pay under Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 1998, by the Pay Verification Unit)** and make payment of first installment thereof on provisional basis after obtaining an undertaking from the pensioner as per **Annexure -II**, in any case before 31st March 2000. By way of illustration an example is given as **Annexure III**. The pension disbursing authority i.e. Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officer, as the case may be should pass such claims on priority basis.

(*b*) The above procedure may also be followed in following cases.—

(*i*) Where authorities for pensionary benefits have not been issued by the Accountant General, Mumbai/Nagpur, but provisional pensionary benefits have been paid by the Heads of Departments/Offices.

(*ii*) Where no pensionary benefits, including those on provisional basis, have been paid.

(*c*) In cases where Pension Payment Order (PPO) has been issued by the Accountant General, Mumbai/Nagpur on the basis of unrevised pay and pensioner is drawing such monthly pension, the Heads of Department/Offices should intimate the amount of provisional pension based on revised pay to the Pay and Accounts Officer, Mumbai/ Treasury Officer, as the case may be, from where the pensioner is drawing his pension. After receipt of such intimation from the Head of Department/Office, the Pension Disbursing Authority i.e. Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officer, as the case may be, should revise the monthly pension accordingly and make payment of such revised pension on provisional basis till the final revised PPO is issued by the Accountant General, Mumbai/Nagpur.

(*d*) Thereafter the Heads of Departments/Offices should forward the pension papers alongwith Service Book after taking necessary entries regarding verification of pay by the Pay Verification Unit, amount of provisional Pension/Family Pension/Gratuity/ Commuted value of Pension etc., to the Accountant General, Mumbai/Nagpur, as the case may be, in any case before 30th September 2000 for authorising revised amounts of Pension/Family Pension/Gratuity and Commutation of Pension.

(*e*) The Accountant General, Mumbai/Nagpur is requested to ensure that the authorisation of revised Pension/Family Pension/Gratuity/Commuted Value of Pension, in terms of these orders, is issued to the Pension Disbursing Authority/Head of Departments/ Offices, under intimation to the pensioner concerned, before the 2nd installment of arrears becomes due i.e. before 31st March 2001.

(*f*) After receipt of the final revised Pension Payment Order (PPO)/Gratuity Payment Order (GPO)/Commutation Value Payment Order (CPO) from the Accountant General, Mumbai/ Nagpur, as the case may be, the Heads of Departments/Offices should draw and disburse second and third installments of arrears during subsequent financial years after adjusting provisional payments and recovery of over payments, if any.

(*g*) In cases where Pension Payment Order/Gratuity Payment Order/Commutation Value Payment Order has already been authorised by the Accountant General, Mumbai/ Nagpur on the basis of unrevised pay, the revised authorities will be issued under the existing PPO/GPO/CPO Number to the Pension Disbursing Authorities i.e. Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officer, as the case may be. The Pension Disbursing Authorities would affix this authority to both halves of PPO.

(*h*) In cases where the pensioners/family pensioners are drawing their pension from the treasuries situated in the States other than Maharashtra, their cases should be submitted to the Accountant General, Mumbai/Nagpur, as the case may be, as usual by highlighting such cases so that Special Seal Authority could be issued by the Accountant General, Mumbai/Nagpur.

14. **In cases of State Government Servants who retire/die-in-harness on or after 1st July 1999, the usual procedure for determination and authorisation of pensionary benefits as laid down in the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 and Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984 should be followed.**

15. Government is also pleased to direct that above decisions should *mutatis mutandis,* apply to those employees of Recognised and Aided Educational Institutions, Non-Agricultural Universities and Affiliated Non-Government Colleges and Agricultural Universities to whom the pension scheme is made applicable.

16. In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samities Act, 1961 (Mah. V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf, Government is further pleased to decide that the above decisions apply to the employees of Zilla Parishads.

17. Formal amendments to the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 in terms of the decisions contained in this order will be issued separately. Provisions of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 which are not specifically modified by these orders, will remain unaffected.

18. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the retirement benefits of the employees mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder. However, if necessary, concerned Administrative Departments of the Mantralaya should take necessary steps to present Supplementary Demands in the ensuing session of the Legislature to cover expenditure to be incurred in respect of aforesaid pensioners.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**VASANT W. CHAUDHARI,**
**Deputy Secretary to Government.**

**(For post–1996 pensioners)**

## ANNEXURE-I

(As referred to in paragraph 6 of Government Resolution, Finance Department, No. PEN-1099/302/SER-4, dated 15th November 1999)

***Example :***

| | | |
|---|---|---|
| (i) Date of retirement | ... | 31st December 1996 (A. N.) |
| (ii) Post last held. | ... | Assistant |
| (iii) Revised pay scale w.e.f. 1st January 1996 | | Rs. 5500—175—9000 |
| (iv) Pensionable pay (Average of last 10 months basic pay) | | Rs. 7,250 |
| (v) Total qualifying service | ... | More than 33 years. |
| (vi) Pension | ... | Rs. 3,625 p.m. |

*Note:* Where total qualifying service is more than 10 years but less than 33 years (say 28 years) pension will be reduced pro-rata (but in no case it will be less than Rs. 1,275 p.m.)

$$\frac{3625 \times 28}{33} = 3075.75$$ i.e. Rs. 3076 p.m.

---

## ANNEXURE-II

(As referred to in para 13 of Government Resolution, Finance Department, No. PEN-1099/302/SER-4, dated 15th November 1999)

I, ........................................................................................................................................ ,
(Name of the pensioner/family pensioner)

hereby undertake that any excess payment that may be found to have been made as a result of incorrect fixation of pay /pension/family pension/gratuity/amount of commuted value of pension or any excess payment detected in the light of discrepancies noticed in this regard subsequently, will be refunded by me to the Government by adjustment against future payments due to me such as pension/family pension/Dearness Relief on pension /family pension/ gratuity /amount of commuted value of pension, if any.

Name and Signature of
Pensioner/Family pensioner.

Date :
Place :

To

..........................................................
(Name & address of the Head of Department/Office)

**(For post-1996 pensioners)**

## ANNEXURE III

(As referred to in para 13 of Government Resolution, Finance Department, No. PEN-1099/302/SER-4, dated 15th November 1999)

ILLUSTRATION ON COMPUTATION OF ARREARS IN CASE OF POST-1ST JANUARY 1996 PENSIONERS

| | | |
|---|---|---|
| (*i*) **Date of Retirement** | : | 28th February 1997 |
| (*ii*) **Last Pay** | : | Rs. 3600 (Un-revised)<br>Rs. 11050 (Revised) |
| (*iii*) **Pensionable Pay** | : | Rs. 3600 (Un-revised)<br>Rs. 11050 (Revised) |
| (*iv*) **Total Qualifying Service** | : | More than 33 years. |

### (1) Pension

**Unrevised**

| | Rs. |
|---|---|
| Total of last 10 months Basic Pay = 3600 x 10 | 36,000 |
| Pensionable pay $\frac{36000}{10}$ | 3,600 |
| **Pension = 50% of Rs. 3600** | 1,800 |

**Revised**

| | Rs. |
|---|---|
| Total of last 10 months Basic Pay = 11050 x 10 | 1,10,500 |
| Pensionable pay $\frac{110500}{10}$ | 11,050 |
| **Pension = 50% of Rs. 11,050** | 5,525 |

### (2) Computation of Total Arrears of Pension and Dearness Relief

| | From 1-3-1997 to 30-6-1997 (Rs. per month) | From 1-7-1997 to 31-12-1997 (Rs. per month) | From 1-1-1998 to 30-6-1998 (Rs. per month) | From 1-7-1998 to 31-12-1998 (Rs. per month) | From 1-1-1999 to 30-6-1999 (Rs. per month) |
|---|---|---|---|---|---|
| **AMOUNT DUE :** | | | | | |
| (1) Revised pension | 5525 | 5525 | 5525 | 5525 | 5525 |
| *Add—* | | | | | |
| (2) Dearness Relief on Revised pension i.e.— | | | | | |
| (i) w.e.f. 1/7/96 4% | ... | ... | ... | ... | ... |
| (ii) w.e.f. 1/1/97 8% | 442 | ... | ... | ... | ... |
| (iii) w.e.f. 1/7/97 13% | ... | 719 | ... | ... | ... |
| (iv) w.e.f. 1/1/98 16% | ... | ... | 884 | ... | ... |
| (v) w.e.f. 1/7/98 22% | ... | ... | ... | 1216 | ... |
| (vi) w.e.f. 1/1/99 32% | ... | ... | ... | ... | 1768 |
| Total—(A) | 5967 | 6244 | 6409 | 6741 | 7293 |

## (2) Computation of Total Arrears of Pension and Dearness Relief—contd.

| | | From 1-3-1997 to 30-6-1997 (Rs. per month) | From 1-7-1997 to 31-12-1997 (Rs. per month) | From 1-1-1998 to 30-6-1998 (Rs. per month) | From 1-7-1998 to 31-12-1998 (Rs. per month) | From 1-1-1999 to 30-6-1999 (Rs. per month) |
|---|---|---|---|---|---|---|
| **AMOUNT DRAWN :** | | | | | | |
| (3) Existing Basic Pension ... | | 1800 | 1800 | 1800 | 1800 | 1800 |
| *Add*—D.R. on existing Basic Pension i.e.— | | | | | | |
| (i) w.e.f. 1/1/96 ... | | ... | ... | ... | ... | |
| (ii) w.e.f. 1/7/96 | | ... | ... | ... | ... | ... |
| Upto Rs. 1750 | 159% | | | | | |
| Rs. 1751 to 3000 | 119% | | | | | |
| (Minimum Rs. 2783) | | | | | | |
| Above Rs. 3000 | 103% | | | | | |
| (Minimum Rs. 3570) | | | | | | |
| (iii) w.e.f. 1/1/97 | | | | | | |
| Upto Rs. 1750 | 170% | | | | | |
| Rs. 1751 to 3000 | 128% | 2975 | ... | ... | ... | ... |
| (Minimum Rs. 2975) | | | | | | |
| Above Rs. 3000 | 110% | | | | | |
| (Minimum Rs. 3840) | | | | | | |
| (iv) w.e.f. 1/7/97 | | ... | | ... | ... | ... |
| Upto Rs. 1750 | 182% | | | | | |
| Rs. 1751 to 3000 | 137% | ... | 3185 | ... | ... | ... |
| (Minimum Rs. 3485) | | | | | | |
| Above Rs. 3000 | 118% | | | | | |
| (Minimum Rs. 4110) | | | | | | |
| (v) w.e.f. 1/1/98 | | ... | ... | | ... | ... |
| Upto Rs. 1750 | 190% | | | | | |
| Rs. 1751 to 3000 | 142% | ... | ... | 3325 | ... | ... |
| (Minimum Rs. 3325) | | | | | | |
| Above Rs. 3000 | 123% | | | | | |
| (Minimum Rs. 4260) | | | | | | |
| (vi) w.e.f. 1/7/98 | | ... | ... | ... | | ... |
| Upto Rs. 1750 | 203% | | | | | |
| Rs. 1751 to 3000 | 152% | ... | ... | ... | 3553 | ... |
| (Minimum Rs. 3553) | | | | | | |
| Above Rs. 3000 | 131% | | | | | |
| (Minimum Rs. 4560) | | | | | | |
| (vii) w.e.f. 1/1/99 | | | | | | |
| Upto Rs. 1750 | 228% | | | | | |
| Rs. 1751 to 3000 | 170% | ... | ... | ... | ... | 3990 |
| (Minimum Rs. 3990) | | | | | | |
| Above Rs. 3000 | 147% | | | | | |
| (Minimum Rs. 5100) | | | | | | |
| (4) Interim Relief-I (Rs. 50) (w.e.f. 1st April 1995) ... | | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| (5) Interim Relief-II (10% of existing Basic Pension (Minimum Rs. 50) (w.e.f. 1-4-1995) | | 180 | 180 | 180 | 180 | 180 |
| (6) Interim Relief-III (10% of existing Basic Pension (Minimum Rs. 100) (w.e.f. 1-4-1996) | | 180 | 180 | 180 | 180 | 180 |
| Total—(B) ... | | 5185 | 5395 | 5535 | 5763 | 6200 |
| (7) Difference = (A)—(B) = C ... | | 782 | 849 | 874 | 978 | 1093 |
| (8) No. of Months (D) ... | | 4 | 6 | 6 | 6 | 6 |
| (9) Arrears (C) x (D) ... | | 3128 | 5094 | 5244 | 5868 | 6558 |
| **Total Arrears of Pension and D.R.** | | | | **Rs. 25,892** | | |

## (3) Retirement Gratuity

| Unrevised | | Rs. | Revised | | Rs. |
|---|---|---|---|---|---|
| Last Pay | ... | 3,600 | Last Pay | ... | 11,050 |
| *Add* : D.A.@ | | | | | |
| 97% of Last Pay | ... | 3,395 | | | |
| Total | ... | 6,995 | | | |
| **Gratuity (3695 x 16.5)** | **...** | **1,15,418** | **Gratuity (11,050 x 16.5)** | **...** | **1,82,325** |

Arrears of Retirement Gratuity = Rs. (1,82,325 — 1,15,418) = Rs. 66,907

## (4) Commutation of Pension

| Unrevised | | Rs. | Revised | | Rs. |
|---|---|---|---|---|---|
| Pension | ... | 1,800 | Pension | ... | 5,525 |
| Commutation of Pension 1/3 x 1,800 | ... | 600 | Commutation of Pension 1/3 x 5,525 | ... | 1,841 |
| Amount of Commutation 600 x 10.46 x 12 | ... | 75,312 | Amount of Commutation 1,841 x 10.46 x 12 | ... | 2,31,082 |

Arrears of Commutation of Pension = Rs. (2,31,082 — 75,312) = Rs. 1,55,770

## (5) Total Arrears

| | | Rs. |
|---|---|---|
| (1) Arrears of Pension and Dearness Relief | ... | 25,892 |
| (2) Arrears of Retirement Gratuity | ... | 66,907 |
| (3) Arrears of Commuted amount of Pension | ... | 1,55,770 |
| **Total Arrears** | **...** | **2,48,569** |

(To be paid in three equal annual installments)

**Each instalment will be of Rs. 82,856.33**

*Printed at the Government Central Press, Mumbai.*